# मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद

## स्वयंपाकी पदाकरिता निवड प्रक्रिया

## <u>नोटीस</u>

क्र. प्रशासन/१९१३/२०२३, दिनांक: ०१/११/२०२३

मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या आस्थापनेवरील स्वयंपाकी पदाकरिता प्रकाशित केलेली जाहिरात दिनांक १०/०४/२०२३ च्या अनुषंगाने दिनांक २८ आणि २९ ऑक्टोबर, २०२३ रोजी स्वयंपाकाची प्रात्यक्षिक परीक्षा आयोजीत करण्यात आली होती. त्याअनुषंगाने खाली नमुद याद्या प्रकाशित करण्यात येत आहेत.

१. स्वयंपाकाच्या प्रात्यक्षिक परिक्षेत उमेदवारांना मिळालेले गुण.

२. शारीरिक कार्यक्षमता चाचणीसाठी पात्र ठरलेल्या १७ उमेदवारांची यादी.

शारीरिक कार्यक्षमता चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी दिनांक ४ नोंव्हेंबर २०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद, औरंगाबाद ४३१ ००९, येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे.

निवड समितीने निश्चित केलेल्या मानांकनाप्रमाणे स्वयंपाकी पदाशी सुसंगत असे शारिरीक कार्यक्षमता चाचणीचे स्वरूप असेल.

ओळखीच्या पुराव्यासाठी उमेदवाराने स्वत:चे आधारकार्ड किंवा निवडणूक आयोगाचे ओळखपत्र किंवा पॅनकार्ड किंवा वाहन चालविण्याचा परवाना किंवा पासपोर्ट पैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र आणणे अनिवार्य आहे. नाव बदललेले असल्यास उमेदवाराने राजपत्र/विवाह नोंदणी पत्र किंवा त्यासंबंधीचे कागदपत्र प्रवेशपत्रासोबत आणणे अनिवार्य आहे.

तसेच उमेदवारांनी शारीरिक कार्यक्षमता चाचणीसाठी येताना स्वयंपाक (प्रात्यक्षिक) परीक्षेच्यावेळी जे प्रवेशपत्र देण्यात आलेले होते ते सोबत आणणे अनिवार्य आहे.

स्वाक्षरीत/—
(विमलनाथ एस. तिवारी)
प्रबंधक (प्रशासन)